# वाढत्या महागाईचा मार: जबाबदार मोदी सरकार!



## भगतसिंह जनअधिकार यात्रा

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**

**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# महागाईचा वाढता मार : जबाबदार मोदी सरकार!

BHAGAT SINGH JAN ADHIKAR YATRA

BSJAY

सहयोग मूल्य : 10 रुपये

भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता प्रकाशित
मे 2023
**प्रकाशक:** परमेश्वर जाधव, संपर्क: 77983 64729
**मुद्रणस्थळ:** आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
**सहयोग मूल्य:** रु. 10/-
www.bsjayatra.com, fb.com/bsjayatra

“बहुत हुई महंगाई की मार, अबकी बार मोदी सरकार!” अशा पद्धतीच्या लोकानुनयी घोषणा देत भाजप सरकार 2014 मध्ये सत्तेत आले होते. आता खुद्द मोदी सरकार यातल्या काही घोषणांचे नावसुद्धा काढत नाही आणि कुणी त्यांना या घोषणांची आठवण करून दिलीच, जसे की “अच्छे दिन”, “बहुत हुई महंगाई की मार, बेरोजगारी की मार, अबकी बार मोदी सरकार”, “बेटी बचाव” इत्यादी, तर त्यांच्यावर देशद्रोहाचे गुन्हे दाखल होतात. या शेवटच्या घोषणेबाबत कुलदीप सेंगर, स्वामी चिन्मयानंद, साक्षी महाराज, निहालचंद मेघवाल, संदीप सिंह यांसारख्या भाजप नेत्यांची प्रकरणे समोर आल्यानंतर ही घोषणा नसून इशारा असल्याचे जनतेला कळले!

**पण 2014 मध्ये जनता नाराज होती, व्यथित होती, खचली होती त्यामुळेच जनतेने या घोषणांवर विश्वास ठेवला.** मात्र काही दिवसांतच या जुमल्यांचे वास्तव समोर आले. रोजगार असो, महागाई असो किंवा शिक्षण आणि आरोग्यसेवा असो (कोरोनाच्या काळात नद्यांमध्ये तरंगणारे मृतदेह कोण विसरू शकेल?) मोदी सरकार प्रत्येक आघाडीवर इतके अपयशी ठरले आहे जितके स्वातंत्र्यानंतर कोणतेही सरकार अपयशी ठरले नाही.

**जनतेसाठी रोजगाराबरोबरच महागाईचा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आहे.** 2014 पूर्वीच्या वस्तूंच्या किमती आणि मोदी सरकारच्या कार्यकाळानंतरच्या वर्षांतील वस्तूंच्या किमतीत मोठी तफावत आहे. गेल्या 9 वर्षात जनतेला प्रचंड महागाईचा सामना करावा लागला आहे. महागाईचा सर्वाधिक फटका कामगार-कष्टकऱ्यांना बसला असला, तरी कोणताही गट याच्या झळीपासून वाचलेला नाही. एकीकडे कष्टकरी लोकांच्या उत्पन्नात कुठलीही वाढ झालेली नाही, उलट उत्पन्न कमीच होत आहे आणि दुसरीकडे महागाई गगनाला भिडत

आहे. खाद्यपदार्थांपासून ते स्वयंपाकाचा गॅस आणि पेट्रोलियम पदार्थांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. पेट्रोल उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्यामुळे घरभाडे आणि इतर प्रत्येक वस्तू किंवा सेवेचे दरही वाढले आहेत.

एका अहवालानुसार **सामान्य माणूस आपल्या उत्पन्नातील 53 टक्के रक्कम फक्त अन्नावर खर्च करतो,** तर श्रीमंतांच्या उत्पन्नाच्या केवळ **12 टक्के** रक्कम अन्नावर खर्च केली जाते. सर्वसामान्य कष्टकरी लोकांच्या ताटातून डाळी आणि भाजीपाला हळूहळू दूर होत आहे. **450 रुपयांचा गॅस सिलिंडर आता मोदींच्या राजवटीत 1150 रुपयांना, 55 रुपयांचे पेट्रोल 100 रुपयांच्या वर मिळत आहे.** हे धादांत खोटे आहे की या वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतीत झालेली वाढ आहे. 6 मार्च 2023 रोजी अमेरिकन डॉलरमध्ये पेट्रोलची किंमत भारतात प्रति लीटर सरासरी $1.269 (104 भारतीय रुपये) होती, तर पाकिस्तानमध्ये ती $0.966 (79.18 भारतीय रुपये), इंडोनेशियामध्ये $0.91 (74.59 भारतीय रुपये), अर्जेंटिनामध्ये $0.938 (76.88 भारतीय रुपये) आणि युद्धग्रस्त अफगाणिस्तानमध्ये तर $0.843 (69.10 भारतीय रुपये) प्रति लीटर इतकी होती.

**वास्तवात पेट्रोलियम पदार्थांच्या किमतींमध्ये निम्म्याहून अधिक हिस्सा सरकारकडून वसूल केला जाणारा अप्रत्यक्ष कर आहे. मोदी सरकार पेट्रोल आणि डिझेलवर किती कर वसूल करते याचे एक उदाहरण बघा. दिल्लीत पेट्रोलची मूळ किंमत 34.19 रु. एवढी आहे. यामध्ये 34.55 रु. डीलर चार्ज, 32.90 रु. उत्पादन शुल्क, व्हॅट 21.36 रु., डीलर कमिशन 3.77 रु. जोडले जाते आणि त्यानंतर प्रति लीटर किंमत होते सुमारे 97 रु. प्रति लीटर. ही अन्यायकारक अप्रत्यक्ष करांद्वारे केलेली लूट नाही तर काय आहे?** पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅसच्या किमती आणि नोटाबंदी, जी.एस.टी. च्या माराने सामान्य जनता पुरती बेहाल झाली असतानाच कोरोनाच्या काळात मोदी सरकारने लागू केलेल्या अनियोजित लॉकडाऊनने जनतेला आणखी वेठीस धरले. कोरोना काळातील अनियोजित लॉकडाऊनमुळे देशाची अवस्था अजून बिकट झाली. या दरम्यान सरकारने भांडवलदारांना करात प्रचंड सूट आणि सवलती दिल्या, परंतु सामान्य जनतेच्या वाट्याला आली गगनाला भिडणारी महागाई!

**पेट्रोलियम पदार्थांवर कर लादून सरकारने सर्वाधिक पैसा गोळा केला आहे आणि तो भांडवलदारांना करात सूट देण्यासाठी, राजकारणी, मंत्री आणि अधिकारी यांना भरघोस पगार देण्यासाठी आणि त्यांच्या ऐशआरामावर खर्च करण्यासाठी वापरला आहे.** सत्तेत बसलेल्या राज्यकर्त्यांची उधळपट्टी व ऐशआराम आणि भांडवलदारांच्या नफ्याचा दर कमी होऊ नये यासाठी अप्रत्यक्ष करांचा बोजा जनतेवर टाकला जातो. महागाई ही एक व्यवस्थेने निर्माण केलेली परिघटना आहे, पण मोदी सरकार आपल्या धोरणांद्वारे त्याचा प्रभाव आणखी पसरवण्याचे काम कसे करत आहे, हे या पुस्तिकेतून आपण जाणून घेऊ.

## विक्रमी महागाई: आकड्यांमध्ये

आठ वर्षे संपता-संपता अखेर नरेंद्र मोदीने देशातील जनतेला "अच्छे दिन" दाखवलेच! मे 2022 मध्ये घाऊक महागाईचा दर **15.08 टक्क्यांवर** आणि याच काळात किरकोळ महागाईचा दर **7.8 टक्क्यांवर** पोहोचला होता. 2023 मध्ये तो थोडा कमी होईल अशी अपेक्षा होती. पण जर आपण गेल्या दोन महिन्यांबद्दल बोललो तर, भारतातील वार्षिक ग्राहक किंमत चलनवाढीचा दर जानेवारी 2023 मध्ये वाढून **6.52 टक्के** इतका झाला आहे, जो डिसेंबरमधील **5.72 टक्क्यां**च्या तुलनेत तीन महिन्यातील सर्वाधिक आहे. चलनवाढ तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या **2-6 टक्के** उद्दिष्टाच्या वर गेली आहे. भारतात महागाई मोजण्यासाठी दोन निर्देशांक वापरले जातात, *ग्राहक किंमत निर्देशांक (Consumer Price Index, CPI, सीपीआय) आणि घाऊक किंमत निर्देशांक (WPI, Wholesale Price Index, डब्ल्युपीआय)*. सीपीआय म्हणजे ग्राहक किंमत निर्देशांक, जो 260 वस्तू आणि सेवांमधील किरकोळ महागाईचे विश्लेषण करतो. तो त्या किमतींच्या जवळ असतो ज्या किमतीला आपल्याला वस्तू दुकानात मिळतात. घाऊक किमतींचा निर्देशांक उत्पादनाच्या ठिकाणी ठोकीने होणाऱ्या खरेदीच्या दरावर ठरतो, जेव्हा की किरकोळ किमतींचा निर्देशांक महागाईचे





अधिक वास्तववादी चित्र प्रस्तुत करतो, म्हणजेच त्या किमती ज्यावर सामान्यपणे आपण बाजारात आपल्या गरजेच्या वस्तू खरेदी करतो. सीपीआय म्हणजेच किरकोळ (किंवा ग्राहक) किंमत निर्देशांकावरून आपण महागाईचे जवळपास अचूक चित्र मिळवू बघू शकतो.

## जनतेच्या खाण्यापिण्याच्या आणि मूलभूत गरजेच्या वस्तूंच्या दरांमध्ये प्रचंड महागाई

जेव्हा मोदींनी 2014 मध्ये सत्ता हाती घेतली तेव्हा किरकोळ महागाई दर सरासरी 5.8 टक्के होता. कच्च्या तेलाच्या कमी किमतींमुळे, 2014 ते 2019 पर्यंत महागाई रिझर्व बँकेच्या आवाक्यात राहिली, पण या आवाक्यात राहण्याचा अर्थ असा नाही की सामान्य लोकांसाठी महागाई कमी होती. कारण सामान्य कष्टकरी लोकांसाठी महागाई केवळ वस्तू आणि सेवांच्या किरकोळ किमतीवरून ठरत नाही, तर त्यांच्या उत्पन्नावरूनही ठरते. हे आता सर्वांना ज्ञात आहे की मोदी सरकारच्या कार्यकाळात मालक, कंपन्या इत्यादींच्या नफ्याचा दर कायम ठेवण्यासाठी भारतातील सर्वसामान्य कष्टकरी लोकांचे उत्पन्न आहे तेवढेच किंवा त्यापेक्षा कमी ठेवण्यात आले आहे. याला 'इन्कम डिप्रेशन' म्हणतात, म्हणजे सर्वसामान्यांच्या वास्तव उत्पन्नात घट. मात्र कोरोना महामारीनंतर 2020 मध्ये रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या मर्यादेपलीकडे महागाईने 6 टक्क्यांचा आकडा

**ग्राहक महागाई (2014-2022)**






पार केला. 2020 मध्ये सरासरी ग्राहक महागाई 6.2 टक्के होती. 2014 ते 2023 पर्यंतची संपूर्ण स्थिती खालील आलेखावरून पाहू शकता.

जर गेल्या तीन महिन्यांतील (जाने-मार्च) किरकोळ किंमत निर्देशांकाचे विश्लेषण केल्यास आपल्याला दिसेल की **धान्ये (16.12टक्के) आणि मसाले (21.09टक्के) यांच्या किमतीतील सर्वाधिक वाढ नोंदवण्याबरोबरच अन्नधान्य महागाई 4.19 टक्के वरून 5.94 टक्के पर्यंत वाढली आहे. घरांच्या महागाईचा दरही झपाट्याने वाढला (4.47 टक्के पासून 4.62 टक्के पर्यंत) आहे; पान, तंबाखू आणि मादक पदार्थ (2.55 टक्के वरून 3.07टक्के), विविध (6.17 टक्के वरून 6.21टक्के), आणि इंधन व प्रकाश (10.84 टक्के वरून 10.97टक्के) यांमध्येही महागाईचा दर चढा राहिला.** मागील महिन्यात सीपीआय डिसेंबरमधील 0.45 टक्के च्या घसरणीच्या तुलनेत 0.46 टक्के ने वाढला.

या आकड्यांपुढे जाऊन ठोस किमतींचा विचार करू, म्हणजे मोदी सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे महागाईने सर्वसामान्यांच्या खिशावर कसा दरोडा घातला आहे याचे स्पष्ट चित्र समोर येऊ शकेल.

घाऊक आणि किरकोळ किंमत निर्देशांकात वाढ झाल्याचा परिणाम म्हणजे मे 2021 ते मे 2022 दरम्यान **पिठाच्या किमतीत 13 टक्क्यांनी वाढ झाली आहे. दुधाने 50 रु./लीटर आणि वनस्पती तेलाने सरासरी 200 रु./लीटरचा आकडा ओलांडला आहे. त्यावेळी घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती 76 टक्क्यांनी वाढल्या होत्या, मात्र अलीकडे त्यात पुन्हा वाढ करण्यात आली असून सिलेंडरची किंमत 1100 रु.च्या पुढे गेली आहे. व्यावसायिक स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती 126 टक्क्यांनी वाढल्या आहेत, आणि ते आता**

**सुमारे 2400 रु. ला विकले जात आहे.** याचा अर्थ म्हणजे सर्वसाधारणपणे खाण्यापिण्याच्या पदार्थांच्या किमतीत प्रचंड वाढ. घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात सातत्याने अन्यायकारक वाढ म्हणजे तर गरीब कष्टकरी जनतेच्या पोटावर लाथ मारण्यासारखे आहे.

**जर आपण 2017 शी तुलना केली, तर तांदूळ 24 टक्के, गहू 24 टक्के, मैदा 28 टक्के, तूर 21 टक्के, मूग 29 टक्के आणि मसूर 32 टक्क्यांनी महाग झाला आहे. त्याचप्रमाणे खाद्यतेलामध्ये शेंगदाणा तेलात 41 टक्के, मोहरीच्या तेलात 71 टक्के, वनस्पती तेलात 112 टक्के, सोयाबीन तेलात 101 टक्के, सूर्यफूल तेलात 107 टक्के आणि पाम तेलात 128 टक्क्यांनी वाढ झाली आहे. भाज्यांमध्ये बटाट्यात 65 टक्के, कांद्यामध्ये 69 टक्के, टोमॅटोमध्ये 155 टक्के वाढ झाली आहे, तर या पाच वर्षांत दुधाच्या दरात 25 टक्के, खुल्या चहा पावडरच्या दरात 41 टक्के वाढ आणि मिठाच्या दरात 28 टक्के वाढ झाली आहे.** आता जरा 2017 पासून आपले **वेतन/पगार किती वाढले याची तुलना करा. जर ही वाढ देखील 60 ते 80 टक्क्यांपर्यंत नसेल तर याचा अर्थ मोदी सरकारच्या धोरणांमुळे आपले वास्तव उत्पन्न कमी झाले आहे** आणि आपण पूर्वीपेक्षा गरीब झालो आहोत. देशातील 80 टक्के कामगार कष्टकरी, गरीब शेतकरी, निम्न आणि मध्यम-मध्यमवर्गीयांचे हेच वास्तव आहे: **म्हणजे गेल्या 8 वर्षांत वास्तविक उत्पन्नात पूर्वीच्या तुलनेत घट झाली आहे आणि गरिबी व दुःखात वाढ झाली आहे. दुसरीकडे, अदानी, अंबानी, टाटा, बिर्ला इत्यादींची म्हणजेच मोदीजींच्या मित्रांची संपत्ती 'दिन दुनी रात चौगुणी' वाढली आहे.**


## महागाईचे एक मुख्य कारण: मोदी सरकारद्वारे विशेषत: पेट्रोलियम उत्पादनांवर आणि इतर सर्व उत्पादनांवर अप्रत्यक्ष करांमध्ये केली गेलेली अन्यायकारक वाढ

मोदी सरकारच्या कार्यकाळात खाद्यान्न आणि पेट्रोलियम पदार्थांच्या दरांमध्ये झालेल्या वाढीला आपण खाली दिलेल्या आलेखावरून पाहू शकतो. याचसोबत 2014 पूर्वी आणि नंतर काही अत्यावश्यक खाद्यपदार्थांच्या किमतींमध्ये आलेल्या प्रचंड वाढीला बघण्यासाठी तुम्ही शेवटच्या तक्त्याचा संदर्भ घेऊ शकता. जिथे पूर्वी 450 रुपयांना सिलिंडर मिळत होता, तो आता 1100

रुपयांचा झाला आहे. मोदी सरकारच्या 'उज्ज्वला योजनेचे' सत्य हे आहे की, सर्वसामान्य गरीब मजुरांच्या घरापर्यंत सिलेंडर पोहोचला तरी तो रिकामाच पडून राहतो कारण बहुतांश कष्टकरी लोकांकडे सिलेंडर भरण्याची क्षमताच नाही.

| **वस्तू** | **2014** | **2022** |
|---|---|---|
| गैस सिलेंडर | 410 | 1050 |
| पेट्रोल | 70 | 100 |
| डीझेल | 55 | 90 |
| मोहरीचे तेल | 90 | 200 |
| दुध | 35 | 60 |

पेट्रोलियम उत्पादनांबद्दल बोलायचे झाले तर गेल्या **जवळपास आठ वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने पेट्रोलियम पदार्थांवर प्रचंड कर लादून सरकारी तिजोरीत पंचवीस लाख कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे.** मोदी सरकारला आयात केलेले **कच्चे तेल अत्यंत स्वस्त दरात मिळाले आहे.** डीलरला मिळणारा वाटाच पेट्रोलच्या किमतीच्या तब्बल **36 टक्के** आहे, जो सरकारने पेट्रोल पंप मालक, दलाल इत्यादींना नफा मिळण्यासाठी ठेवला आहे. **याउपर केंद्र सरकार त्यावर 37 टक्के कर वसूल करते आणि सुमारे 23 टक्के व्हॅट राज्य सरकारे लावतात.** उर्वरित 3-4 टक्के डीलरचे कमिशन, वाहतूक खर्च इ. असतो. **याचा अर्थ सरकारच्या करामुळेच पेट्रोलच्या किमती 90 च्या पुढे (आणि काही ठिकाणी 100 च्या**



**पुढे) गेल्या आहेत.**

**2013 पर्यंत पेट्रोलवर केंद्र आणि राज्यांचा एकत्रित कर 44 टक्के इतका होता, आता हा कर 100-110 टक्के इतका वाढला आहे.** चला, मोदी सरकारकडून पेट्रोल आणि डिझेलवर होत असलेली लूट समजून घेऊयात.

| **कच्च्या तेलाची किंमत** | **68 डॉलर/बॅरल** |
|---|---|
| 159 लीटर कच्च्या तेलाची किंमत | 68 $ |
| 1 लीटर कच्च्या तेलाची किंमत | 0.427 $ = 35.32 रुपये |
| 1 लीटर पेट्रोलच्या शुद्धीकरणावर खर्च | जवळपास 3 रुपये |
| वापरण्यायोग्य प्रति लीटर पेट्रोल वर सरकारचा खर्च | जवळपास 38.32 रुपये |
| जनतेसाठी पेट्रोलची किंमत | जवळपास 100 रुपये |
| **प्रति लीटरवर वास्तव किमतीपेक्षा 156 टक्के जास्त टॅक्स वसूल केला जात आहे!** | |

**आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल 68 डॉलर आहे, म्हणजे 159 लीटरची किंमत 68 डॉलर. म्हणजे प्रति लीटर पेट्रोलची आंतरराष्ट्रीय किंमत आहे 0.427 डॉलर. भारतीय रुपयांमध्ये कच्च्या तेलाची आंतरराष्ट्रीय किंमत प्रति लीटर फक्त 35.32 रुपये आहे. एक लीटर कच्चे तेल शुद्ध करण्यासाठी सुमारे 3 रुपये खर्च येतो. म्हणजेच सरकारला वापरण्यायोग्य पेट्रोलसाठी प्रतिलिटर सुमारे 38.32 रुपये खर्च करावे लागतात. पण आमच्यासाठी पेट्रोल 100 रुपयांवर पोहोचले आहे. म्हणजेच, पेट्रोलच्या एकूण किमतीत खरी किंमत केवळ 38-29 रुपये आहे, मात्र आपण मोजत आहोत 96 ते 110 रुपये. म्हणजे प्रत्येक लीटरच्या वास्तविक किमतीपेक्षा 156 टक्के जास्त आपण फक्त कर भरत आहोत! जगातील क्वचितच एखादा देश पेट्रोलवर इतका मोठा कर आकारत असेल. उदाहरणार्थ, यूकेमध्ये तेलावर 61टक्के, फ्रान्समध्ये 59 टक्के आणि यूएसमध्ये 21 टक्के कर आकारला जातो.** मालाच्या किमतीपेक्षाही अधिक कर लावून जनतेला माल विकणे ही दरोडेखोरी नाही तर काय आहे? **मोदी ने अगदी बरोबरच म्हटले होते: "व्यवसाय माझ्या रक्तात आहे, पैसा माझ्या रक्तात आहे!"** (3 सप्टेंबर 2014, डेक्कन क्रॉनिकल, मोदींचे विधान)

हे स्पष्ट आहे की देशातील वित्तीय तूट भरून काढण्यासाठी सरकार तेलावर प्रचंड कर लादत आहे. या अर्थसंकल्पात पेट्रोलियम पदार्थांवरील एकूण सबसिडी 9171 कोटी रुपयांवरून कमी करून ती 2257 कोटी रुपये करण्यात आली आहे. ज्ञात असावे की 2020-21 मध्ये ती 37,000 कोटी रुपये होती. सरकारच्या या सुरुवातीच्या पावलांवरून त्यांचा हा हेतू स्पष्ट आहे की आगामी काळात स्वयंपाकाच्या गॅसपासून ते डिझेल आणि पेट्रोल आणखी महाग होणार आहे. **मोदी सरकारच्या राजवटीत पेट्रोलियम पदार्थांवरील भरमसाठ कर हे सरकारद्वारे जनतेची लूट करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे!**

**तुम्ही विचाराल की सरकारच्या आर्थिक तुटीचे कारण काय आहे?** सरकारच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत आहेत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर. याशिवाय काही गैर-कर स्रोत आहेत जे सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या 20 टक्केच आहेत. यामध्ये सरकारी उपक्रमांचा नफा, कर्जावरील व्याज, नियामक शुल्क इत्यादींचा समावेश होतो. इतर स्रोत, जसे की सरकारी रोख्यांमधून घेतलेले कर्ज आणि त्यांचे व्याज हे देखील शेवटी सरकार कर लावूनच भरते. **भारतात, मुख्यतः सामान्य कष्टकरी जनतेने भरलेला अप्रत्यक्ष कर, ज्यामध्ये जीएसटी, व्हॅट, सरकारी उत्पादन शुल्क इत्यादींचा समावेश आहे, यांचा सरकारी तिजोरीत सुमारे 60 टक्के वाटा आहे.** हा असा कर आहे जो आपण सर्व वस्तू आणि सेवांच्या खरेदीवर भरत असतो, ज्यावर लिहिलेलेच असते 'सर्व करांसहित'. याशिवाय सरकार बडे मालक, भांडवलदार, कंपन्या इत्यादींकडून प्रत्यक्ष कर वसूल करते, जो 1990 च्या दशकापर्यंत उत्पन्नाच्या 50 टक्क्यांपर्यंत असायचा आणि आता तो 30 टक्क्यांपर्यंत खाली आणला गेला आहे. **कॉर्पोरेट आणि श्रीमंतांवरील प्रत्यक्ष करात सातत्याने कपात केल्यामुळे सरकारचे नुकसान होत आहे. दुसरे कारण म्हणजे या मोठमोठ्या कंपन्यांना करात सवलत देणे,**



BBC NEWS | हिन्दी

**मोफत वीज, मोफत पाणी, कवडीमोल भावात जमीन देणे, तोटा झाल्यास सरकारी खर्चातून त्यांना वाचवणे आणि जनतेने सरकारी बँकेत जमा केलेल्या पैशातून त्यांना अत्यंत कमी व्याजदरात कर्ज देणे, त्या कर्जांनासुद्धा माफ करणे किंवा त्यांना बुडीत खात्यात म्हणजेच एनपीए (नॉन परफॉर्मिंग अॅसेट) सांगून या धनाढ्यांना ते फुकटात सोपवणे, या मार्गाने दिलेले नजराणे.** आता श्रीमंतांना दिलेल्या या फुकटच्या सवलतींमुळे सरकारी तिजोरीचे जे नुकसान होते ते मोदी सरकार तुमच्या-आमच्यावर कराचा बोजा लादून भरून काढत आहे. **याआधीची सरकारेही हेच करत होती, पण धनदांडग्यांसमोर लोळण घेण्यात आणि त्यांची सेवा करण्यात मोदीजींनी सर्वांनाच मागे टाकले आहे!**

हे जे कर सातत्याने वाढवले जात आहेत, त्यातील सर्वात मोठा भाग पेट्रोलियम पदार्थांवरील करांचा आहे. तेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढल्यानंतर रिकामे सिलिंडर आणि भाजीपाल्याचा हार घालून रस्त्यावर बोंबा मारणारे स्मृती इराणी आणि भाजपई दुकानदार आणि नेते आज गायब आहेत! का? कारण पूर्वीची महागाई राष्ट्रवादी नव्हती, ती धर्माच्या विरोधात होती आणि मोदीजींनी जी महागाई आणली आहे ती राष्ट्रवादी महागाई आहे, तिने धर्माची पताका फडकवली आहे! अशा फालतू गोष्टी सांगून तुम्हाला फसवले जात आहे. जितक्या लवकर आपण हे समजून घेऊ तितके चांगले.

हेही समजून घेतले पाहिजे की जो सतत कमी होत जाणारा प्रत्यक्ष कर मोठमोठे धनाढ्य आपल्या तिजोऱ्यांमधून देत आहेत, त्या तिजोऱ्यांना भरण्याचे काम सुद्धा अंबानी-अदानी सारख्या लोकांनी स्वतः कष्ट करून केलेले नाही. त्यासुद्धा सर्वसामान्य कष्टकरी लोकांनी आपल्या मेहनतीने भरल्या आहेत. **स्वतःमध्ये धन हे दुसरे काहीही नसून देशामध्ये उत्पादित होणाऱ्या सर्व उत्पादनांच्या (वस्तू आणि सेवांच्या) मूल्याचे प्रतिबिंब आहे, त्याची अभिव्यक्ती आहे. सर्व वस्तू आणि सेवांचे उत्पादन कोण करतो? ते कामगार, कष्टकरी आणि गरीब शेतकरी, कचेरीत जाणारे निम्न आणि मध्य-मध्यमवर्गीय लोक निर्माण करतात, ना की खाऊन पिऊन आळस देणारे शेठ लोक!** तुम्ही म्हणाल की, 'पण कारखाना आणि इतर उत्पादनाची साधने तर या शेठांची आहेत!' पण मित्रांनो इथे दोन गोष्टींकडे लक्ष द्या, **पहिली गोष्ट म्हणजे** ही **उत्पादनाची साधने त्यांच्याकडे आली कुठून?** तीसुद्धा मजुरांनी, कष्टकऱ्यांनीच बनवली आहेत

किंवा खाणी-जमिनीसारखे स्रोत जे निसर्गाची देणगी आहेत, ज्यावर प्रत्येक व्यक्तीचा समान अधिकार आहे. अगदी सुरुवातीला या श्रीमंत लोकांनी त्यांच्या राज्यसत्तांच्या मदतीने जनतेवर बळजबरी करून लोकांच्या शेतजमिनी, खाणी आणि उत्पादनाची सर्व साधने हिसकावून घेतली, आणि याद्वारे सर्व जमीन आणि उत्पादनाची साधने मुठभर श्रीमंतांच्या हातात आली. तुम्ही प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळाचा इतिहास वाचला तर तुम्हाला ही सत्ये कळतील. **दुसरी गोष्ट,** मजूर एक-दोन वर्षातच कारखानदारांच्या कारखान्यातील सर्व उत्पादन साधनांच्या, म्हणजे इमारती, यंत्रे इत्यादींच्या खर्चाइतका नफा भांडवलदारांना मिळवून देतात. त्यानंतर कायद्याने तर या सर्व संपत्तीवर कामगारांचा सामाईक हक्क असायला हवा.


**म्हणूनच सर्व शेठ, व्यापारी, श्रीमंत लोक प्रत्यक्ष कर म्हणून जो नफ्याचा एक भाग देतात, तो सुद्धा जनतेचीच संपत्ती आहे, या धनदांडग्यांच्या बापजाद्यांनी निर्माण केली नाही.** आपण त्यांच्याकडे काबाडकष्ट करायला बाध्य असतो कारण आपल्याकडे आपल्या मेहनत करण्याच्या क्षमतेशिवाय काहीही नाही, आपली सर्व संसाधने, निसर्गावरील आपला सामाईक हक्क अनेक शतकांपूर्वी लुटला आणि हिरावला गेला आणि आजही लुटला व हिरावून घेतला जात आहे.

**त्यामुळे आजच्या काळाची एक प्रमुख मागणी म्हणजे सरकारने सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करावेत, जे प्रामुख्याने सामान्य कष्टकरी लोक देतात आणि जे महागाई वाढण्याचे प्रमुख कारण आहेत,** कारण समाजासाठी आवश्यक असलेल्या सुईपासून जहाजापर्यंत सर्व गोष्टी निर्माण करून कष्टकरी जनतेने मोफत आणि समान शिक्षण, मोफत आणि समान आरोग्य सेवा, सरकारी घरे, रोजगाराचा हक्क आणि इतर सर्व मूलभूत गरजांसाठी लागणारी किंमत आधीच मोजली आहे. आता त्याच्यावर अप्रत्यक्ष कराचा बोजा अजिबात लादला गेला नाही पाहिजे. सर्व वस्तूंचे स्वतः उत्पादन करणाऱ्या उत्पादक वर्गाने वस्तू खरेदी करण्यासाठी सरकारला कर का द्यावा? आपापसात विनिमय करण्यासाठी तो त्यांची किंमत देऊ शकतो, परंतु सरकारी नेते, मंत्री आणि भांडवलदारांना फुकटच्या सवलती देण्यासाठी त्याने अप्रत्यक्ष कर का भरावा? सरकारला आपल्या खर्चासाठी पैशांची निश्चितच गरज असते, परंतु त्यांनी ते श्रीमंत वर्ग, कॉर्पोरेट, उच्च मध्यमवर्ग इत्यादींकडून कॉर्पोरेट कर, आयकर, मालमत्ता कर,

वारसा कर या प्रत्यक्ष कराच्या माध्यमातून वसूल करावा, म्हणजे त्या वर्गांकडून जे कुठल्याही आवश्यक वस्तू वा सेवांचे उत्पादन करत नाहीत, केवळ जळूप्रमाणे समाजाच्या शरीराला चिकटून राहतात आणि त्याचे रक्त शोषतात.

## महागाई ही नैसर्गिक संकट नाही, ती धनाढ्यांच्या नफेखोरीचा परिणाम आहे!

मित्रांनो, महागाई ही काही नैसर्गिक संकट नाही ज्याला नियंत्रित करता येऊ शकत नाही. वास्तवात महागाई ही या नफ्यावर आधारित भांडवली व्यवस्थेची नैसर्गिक निर्मिती आहे. आपण हे समजून घेतले पाहिजे की महागाई ही एका अशा व्यवस्थेने निर्माण केली आहे जिच्या केंद्रस्थानी भांडवलदार वर्गाचा नफा आहे, ना की समाजाच्या गरजा पूर्ण करणे. अशा व्यवस्थेत समाजाच्या सर्व गरजांचे योजनाबद्ध मूल्यमापन करून उत्पादन, विनिमय आणि वितरण होत नाही. याच्या परिणामी उत्पादनात अराजकता असते. ही अराजकता सुद्धा विविध वस्तू आणि सेवांच्या किमती वेळोवेळी वाढवत असते. सध्याच्या युगातही या तीव्र महागाईच्या मागे संपूर्ण भांडवलदार वर्ग, त्याची नफेखोर आणि अराजक अर्थव्यवस्था आणि अशा आर्थिक संबंधांचे संरक्षण करणारी राज्यसत्ता उभी आहे. मुठभर भांडवलदारांचा नफा सुरळीत ठेवण्यासाठी संकट काळात त्याचे ओझे सर्वसामान्य कष्टकरी जनतेवर टाकले जाते. विविध मार्गांनी मजुरीमध्ये कपात करून भांडवलदारांच्या नफ्याचा दर



स्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन विभाग, भारत सरकार.
एप्रिल 2021 पर्यंत

कायम ठेवला जातो. **महागाईची ही सामान्य मूलभूत कारणे आहेत.** गेल्या दीड दशकापासून संपूर्ण जागतिक व्यवस्थेत आलेल्या नफ्याच्या घसरत्या दराचे संकट कोरोनाच्या काळात आणि त्यानंतर लावलेल्या अनियोजित लॉकडाऊनमुळे अधिक गडद झाले आहे.

**नफ्याची प्रचंड हाव हेच खरे तर नफ्याच्या घसरत्या सरासरी दराचे कारण असते.** उत्पादनाची प्रक्रिया अशी असते की निरंतर प्रक्रियेत जिवंत श्रम म्हणजेच मजुरीचा वाटा तुलनेने कमी होत जातो आणि मृत श्रमाचा (म्हणजे मशीन, कच्चा माल इत्यादी) वाटा वाढत जातो, ज्यामुळे अंतिमतः नफ्याचा सरासरी दर कमी होतो. जेव्हा नफ्याचा सरासरी दर घसरतो तेव्हा भांडवलदार वर्गाच्या गुंतवणुकीचा दरही घसरतो कारण इथे उत्पादनाचा उद्देश लोकांच्या गरजा भागवणे नसून जास्तीत जास्त नफा उकळणे हा असतो. अशा वेळी हा वर्ग उत्पादनात गुंतवणूक करण्याऐवजी सट्टेबाजी आणि शेअर बाजारात आपले भांडवल खर्च करतो. गुंतवणुकीचा दर कमी झाल्यामुळे रोजगाराचा दर कमी होतो, मजुरांची राखीव फौज वाढते आणि त्यामुळे सरासरी मजुरी कमी होते आणि याबरोबरच संकट काळात, गुंतवणुकीत घट झाल्याने सर्व वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यातही मागणीच्या तुलनेत घट होऊ शकते. वस्तू आणि सेवांच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ होत नसतानाही, सरासरी वेतन कमी झाल्यामुळे सामान्य कष्टकरी वर्गासाठी महागाई वाढते. परंतु एका अराजक व्यवस्थेत वास्तविक बाजार किमतींमध्येही वाढ होऊ शकते. अशा प्रकारे कामगारांची वास्तविक मजुरी कमी होते आणि त्यांच्यासाठी महागाईचा दर वाढतो.

एका भांडवली व्यवस्थेत बेरोजगारी, विषमता, मंदी, गरिबी यासारख्या इतर समस्यांप्रमाणेच महागाईसुद्धा व्यवस्था निर्मित आहे. पण याचसोबत सध्याच्या काळात महागाईची काही अन्य प्रमुख कारणे आहेत. विशेषतः मोदी सरकारच्या कार्यकाळात महागाईने आपले सर्व जुने रेकॉर्ड तोडले आहेत आणि याचे कारण मोदी सरकारची भांडवली धोरणे राबविण्याची हुकूमशाही पद्धत आहे ज्याची आपण पुढे चर्चा करू. कोरोना महामारीच्या काळात जगातील बहुतेक देशांमध्ये भांडवलदार वर्गाने लादलेल्या अनियोजित प्रकारच्या लॉकडाऊनचा जगभरातील उत्पादन आणि अभिसरण व्यवस्थेवर वाईट परिणाम झाला. यामुळे जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि बाजारपेठेतील

बहुतांश वस्तू आणि सेवांच्या मागणी आणि पुरवठ्यात प्रचंड असंतुलन निर्माण झाले ज्यामुळे त्यांच्या किमती वाढू लागल्या. लॉकडाऊन संपल्यानंतर अचानक मागणीत आणखी वाढ झाली. गेल्या वर्षी वनस्पती तेलाच्या किमतीत झालेल्या जबरदस्त वाढीचे हेच प्रमुख कारण होते. भारताबद्दल बोलायचे झाल्यास भारत आपल्या खाद्यतेलाच्या 60 टक्के पेक्षा जास्त वापरासाठी आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे जागतिक बाजारात झालेल्या भाववाढीचा फटका भारतातील खाद्यतेलाच्या किमतीलाही बसला. **कोरोनाच्या काळात सापेक्ष मागणीत अनपेक्षित वाढ झाल्यामुळे केवळ बड्या भांडवलदार-धनाढ्यांनीच नव्हे तर व्यापारी-दलाल, श्रीमंत शेतकरी आणि कुलक यांनीही या संकटाचे संधीत रूपांतर करीत आपल्या वस्तूंची चढ्या दराने विक्री केली, ज्याला व्यापार, साठेबाजी आणि सट्टेबाजीच्या माध्यमातून सर्व नफेखोरांनी आणखी वाढवले. त्यात तेलबियाचे उत्पादन करणारे श्रीमंत शेतकरी, मध्यस्थ, कमिशन एजंट, व्यापारी या सर्वांचा समावेश होता, जे सट्टेबाजी आणि साठेबाजीच्या माध्यमातून भाव आणखी वाढवत होते.** लोकांच्या गरजा भागवणे हा उद्देश असलेली व्यवस्था असली तर अशी परिस्थितीच उद्भवली नसती कारण या काळातही बहुतांश वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण केली जात होती, जेणेकरून त्यांच्या किमती वाढवता येतील. **वास्तवात साठेबाजी आणि फ्युचर्स ट्रेडिंगद्वारे सट्टा लावून मालक, श्रीमंत शेतकरी, मध्यस्थ, नोकरदार, व्यापारी इत्यादींद्वारे आपल्या नफ्यासाठी कृत्रिमरित्या किमती वाढवणे आणि काळाबाजार करणे हे आपल्या देशातील महागाईचे एक महत्त्वाचे कारण आहे. हे सर्व गैरकृत्य कधीच सरकारच्या मूकसंमती आणि पाठिंब्याशिवाय होऊ शकत नाही.**

कोरोना व्यतिरिक्त मूलभूत वस्तूंच्या पुरवठा साखळीतील व्यत्यय रशिया-युक्रेन युद्धामुळे झाला. रशिया हा तेल आणि नैसर्गिक वायूचा प्रमुख पुरवठादार आहे आणि रशियाकडून होणारा पुरवठा खंडित झाल्यामुळे जागतिक बाजारपेठेत तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ झाली आहे आणि त्यांच्या किमतीत वाढ झाल्यामुळे इतर उत्पादनांच्या किमतीही वाढल्या आहेत कारण इतर उत्पादनांच्या उत्पादनात कच्चा माल म्हणून तेल आणि नैसर्गिक वायू यांचा समावेश होतो, तसेच संपूर्ण वाहतूक व्यवस्था त्यांच्यावर अवलंबून असते. याशिवाय, रशिया आणि युक्रेन मिळून जगातील गव्हाच्या पुरवठ्याचा मोठा

वाटा उचलतात. युक्रेन सूर्यफूल आणि मकाही मोठ्या प्रमाणावर निर्यात करतो. युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत या खाद्यपदार्थांच्या पुरवठ्यातही मोठी घट झाली, ज्यामुळे या मूलभूत वस्तूंच्या किमतींनी मोठी उडी घेतली. **त्यामुळे संपूर्ण भांडवलदार वर्ग, म्हणजे मालक, कंपन्या, व्यापारी, श्रीमंत शेतकरी, दलाल, कमिशन एजंट, मध्यस्थ इत्यादी सर्व वर्ग विविध देशांत त्याचा फायदा घेत आहे. भारतातही गव्हाचे उत्पादन करणाऱ्या भांडवलदार कुलक-शेतकऱ्यांनी सरकारी बाजारात गहू कवडीमोल भावाने विकण्याऐवजी खुल्या बाजारात 30 ते 40 टक्के जादा दराने विकून प्रचंड नफा कमावला.** अन्नधान्याच्या व्यापारात आणि प्रक्रियेत गुंतलेले बडे भांडवलदारही त्याचा पुरेपूर फायदा घेण्यात गुंतले आहेत. गहू आणि इतर खाद्यान्नासहित भाजीपाला आणि खाद्यतेलाच्या किमतीत झालेल्या वाढीचा थेट परिणाम गरीब कष्टकरी लोकसंख्येवर होत आहे, ज्याला श्रीमंत आणि धनाढ्यांचा संपूर्ण वर्ग थेट जबाबदार आहे, ज्यांच्या सेवेसाठी पायघड्या पसरून मोदी सरकार बसले आहे. कारण त्यांच्याच देणग्यांवर संघ परिवार आणि भाजप यांचा 'राष्ट्रवाद' आणि 'धर्म रक्षणाचा' बाजार चालतो.

**महागाईच्या इतर प्रमुख कारणांपैकी एक सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे व्यापक कष्टकरी जनतेच्या सरासरी उत्पन्नात झालेली घट, ज्यामुळे वास्तविक मजुरी कमी झाली आणि विशेषतः कष्टकरी लोकांसाठी महागाई वाढली.** व्यापक कष्टकरी लोकसंख्येची सरासरी मजुरी कमी करण्यासाठी मोदी सरकार सर्वोपरी प्रयत्न करत आहे आणि त्यामुळे वाढत्या महागाईचा सर्वाधिक फटका कष्टकरी जनतेलाच सहन करावा लागत आहे.

## सामान्य कष्टकरी लोकसंख्येच्या उत्पन्नात घट आणि महागाईचा उद्रेक

एका बाजूला सर्व वस्तूंच्या किमती वाढत आहेत आणि दुसरीकडे सर्वसामान्य कष्टकरी लोकांचे उत्पन्न एकतर घटले आहे किंवा ते जवळपास स्थिर आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची क्रयशक्ती पूर्वीपेक्षा कमी झाली आहे. नुकत्याच आलेल्या एका अहवालानुसार **जर तुम्ही महिना रु. 25,000 कमवत असाल तर तुम्ही भारतातील वरच्या 10 टक्के लोकसंख्येमध्ये आहात!** मोलमजुरी करणाऱ्या भारतातील **57 टक्के लोकसंख्येचे मासिक उत्पन्न 10,000 रुपये**

**प्रति महिना पेक्षाही कमी आहे** आणि सर्व मोलमजुरी करणाऱ्या कामगारांचे सरासरी उत्पन्न **रु. 16,000** महिना एवढे आहे. निश्चितच, यात सर्वात कमी कमाई असणारे कामगार ते आहेत जे अनौपचारिक आणि असंघटित क्षेत्रात काम करतात आणि ते एकूण कामगार लोकसंख्येच्या सुमारे **93 टक्के** आहेत. म्हणजेच, एकीकडे महागाई सर्व विक्रम मोडत आहे, तर दुसरीकडे सामान्य कष्टकरी लोकसंख्येचे सरासरी उत्पन्न, विशेषतः कोविड महामारीनंतर, एकतर स्थिर आहे किंवा कमी झाले आहे. **2021-22** या आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत, ग्रामीण वास्तविक  शेतमजुरीमध्ये केवळ **1.6 टक्क्यांनी** वाढ झाली, तर ग्रामीण बिगरशेती वास्तविक मजुरीमध्ये **1.2 टक्क्यांनी** घसरण झाली. **2019 ते 2021** पर्यंत भारतातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सरासरी वास्तविक उत्पन्न **6.3 टक्क्यांनी** वाढले आहे. याच काळात मनरेगा कामगारांच्या वास्तविक वेतनात केवळ **4 टक्क्यांनी** वाढ झाली आहे. याशिवाय, शेअर बाजारात सूचीबद्ध **2800 कंपन्यांच्या** कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नात **13 टक्क्यांनी** वाढ झाली असली, तरी यातील मोठा हिस्सा मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांकडे गेला आणि सामान्य कामगारांच्या वेतनात फारच कमी वाढ झाली आहे. **याच दरम्यान, महागाई 40 ते 60 टक्क्यांनी वाढली, म्हणजेच या सर्व कामगारांचे वास्तविक उत्पन्न घटले आणि ते पूर्वीपेक्षा गरीब झाले. सर्वात वाईट स्थिती अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची राहिली आहे.** कोविड महामारीच्या काळातच वाढलेल्या बेरोजगारीमुळे त्यांच्या सरासरी मजुरीत  **22 टक्क्यांची** घसरण झाली. जमिनीवरील वास्तव याहून भीषण आहे. खुद्द कामगार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसारच, भारतातील **45 टक्के** मजुरांना **10,000 रुपयांपेक्षा** कमी पगार दिला जातो, तर महिला मजुरांना (ज्या एकूण कामगार लोकसंख्येच्या **32 टक्के** आहेत) **रुपये 5,000** पेक्षा कमी वेतन मिळते. **ग्रामीण भागातील मजुरांची अवस्था तर अधिकच बिकट आहे.** तक्त्यानुसार, भारतातील कृषी क्षेत्रातील सरासरी मजुरीचा दर **344 रुपये प्रतिदिन** आहे. परंतु सत्य हे आहे की शेतात, वीटभट्ट्यांवर, इमारत बांधकाम इत्यादी काम करणाऱ्या मजुरांना **200 ते 250 रुपये** प्रतिदिन या दराने काम करण्यास बाध्य व्हावे लागते. **1984** मध्ये एकूण उत्पादन खर्चाच्या **45 टक्के** हिस्सा मजुरी म्हणून दिला जात होता, तो **2010** पर्यंत **25 टक्के** झाला आहे. आता तर त्यात आणखी घट झाली आहे.

**संघटित क्षेत्रात निर्माण होणाऱ्या प्रत्येक 10 रुपयांमागे कामगार वर्गाला केवळ 23 पैसे मिळतात.** त्यातच मोदी सरकारने उरलेसुरले कामगार कायदेही रद्द केले आहेत आणि त्यांच्या जागी चार लेबर कोड बनवले आहेत आणि किमान वेतन कायदेशीररीत्या कमी केले जात आहे. सरकारच्या कामगार मंत्र्यांनी किमान मजुरी प्रतिदिन 178 रुपये करण्याची घोषणा करून टाकली आहे. म्हणजेच मासिक उत्पन्न असेल फक्त **4,628 रुपये! राजकारणी, नोकरशहा, व्यवस्थापक जे काहीही करत नाहीत आणि परजीवीसारखे लोकांचे रक्त शोषत आहेत त्यांना हे किमान वेतन स्वीकारण्यास भाग पाडले असते, तर चांगले झाले असते.** ही रक्कम आर्थिक सर्वेक्षण 2017 मध्ये शिफारस केलेल्या आणि सातव्या वेतन आयोगाने निश्चित केलेल्या **रु.18,000** या किमान मासिक उत्पन्नाच्या फक्त एक चतुर्थांश आहे, जेव्हा की आज रु. 18,000 सुद्धा सन्मानाचे जीवन जगण्यासाठी पुरेसे वेतन नाही. एवढेच नव्हे तर पंधराव्या राष्ट्रीय कामगार परिषदेच्या (1957) शिफारशी (ज्यानुसार अन्न, वस्त्र, घर इत्यादी मूलभूत गरजांच्या आधारे किमान वेतन निश्चित केले पाहिजे) आणि 1992 मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून आवश्यक उष्मांक गरज 2700 ऐवजी 2400 निश्चित केली आहे आणि सर्व मूलभूत गोष्टींची किंमत देखील 2012 च्या किमतीच्या आधारावर निश्चित केली गेली आहे! **म्हणजेच मोदी सरकारकडून मजुरांची मजुरी कमीत कमी करण्याची सरळसरळ धोकेबाजी आणि भ्रष्टाचार केला जात आहे.** मोदी सरकारच्या या धोरणांचा परिणाम म्हणजे कामगार वर्गाचे उत्पन्न खाली आले आहे आणि महागाईचा फटका पूर्वीपेक्षा जास्त बसत आहे.

घटत्या उत्पन्नाचा आणि वस्तूंच्या वाढत्या किमतीचा परिणाम म्हणजे कष्टकरी जनतेच्या ताटातून डाळी आणि भाजीपाला सतत गायब होत चालला आहे. 2012 मध्ये नॅशनल न्यूट्रिशन मॉनिटरिंग ब्युरोने केलेल्या शेवटच्या सर्वेक्षणात असे नोंदवले गेले होते की 1979 च्या तुलनेत 2012 मध्ये प्रत्येक गावकऱ्याला सरासरी 550 कॅलरी ऊर्जा, 13 ग्रॅम प्रथिने, 5 मिलिग्रॅम लोह, 250 मिलिग्रॅम कॅल्शिअम आणि 500 मिलिग्रॅम 'अ' जीवनसत्त्व प्रतिदिन कमी मिळत होते. आता वरील आकड्यांवरून स्पष्टपणे हा अंदाज लावता येऊ शकतो की किमतीत वाढ झाल्यामुळे हे आकडे गेल्या 10 वर्षात आणखी भीषण झाले असतील.

लोकसंख्येचा एक मोठा भाग जेमतेम केवळ दैनंदिन वस्तू जुळवू शकेल एवढेच कमावत आहे.

## भांडवलदारांना खुली सूट व सवलती आणि जनतेवर करांचा वाढता बोजा!

महामारीपूर्वी, 2019 मध्ये, केंद्र सरकारने कॉर्पोरेट टॅक्स स्लॅब 30 टक्क्यांवरून 22 टक्क्यांपर्यंत कमी केला होता, आणि त्यातही नव्याने स्थापन कंपन्या कमी टक्केवारीने (15 **टक्के**) कर भरत होत्या. या नवीन कर धोरणामुळे एकूण 1.84 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आणि यामुळे सरकारला 2019-20 मध्ये कर महसुलात सुधारणा करण्याची गरज पडली. महसूल वाढवण्यासाठी केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) वाढवला आणि डिझेल व पेट्रोलवरील उत्पादन शुल्क वाढवले. जीएसटी आणि इंधन कर या दोन्हींच्या अप्रत्यक्ष स्वरूपाने त्यांना प्रतिगामी बनवले आहे, ज्यामुळे कष्टकरी लोकसंख्येवर भार वाढत गेला आहे. 18 जुलै 2022 पासून मोदी सरकारने खाद्यपदार्थांसारख्या मूलभूत गोष्टींवर पाच टक्के जीएसटी लावण्याचा निर्णय घेतला. यानंतर **25 किलो/25 लीटरपेक्षा** कमी असलेले अन्नधान्य आणि तेलाचे दर महागले आहेत. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने माहिती दिली आहे की 25 किलोपेक्षा कमी प्री-पॅकेज केलेल्या सर्व खाद्यपदार्थांवर पाच टक्के जीएसटी लावला जाईल. खाद्यपदार्थांवर जीएसटी लागू झाल्यानंतर प्रामुख्याने मैदा, तांदूळ, डाळी, तेल, पनीर, दही यासारख्या वस्तू महागल्या आहेत.

जीएसटी लावणे एका बाजूला, दुसरीकडे उत्पन्नानुसार भराव्या लागणाऱ्या **प्रत्यक्ष करातही कपात करण्यात आली असून त्याऐवजी अप्रत्यक्ष करात वाढ करण्यात आली आहे**. ऑक्सफॅमच्या एका अहवालानुसार अखिल भारतीय स्तरावर, उत्पन्नाच्या आकडेवारीनुसार, **खालची 50 टक्के लोकसंख्या वरच्या 10 टक्क्यांपेक्षा अप्रत्यक्ष कर भरण्यात सहा पट अधिक योगदान देते.** सर्व खाद्य आणि गैरखाद्य वस्तूंवरील एकूण करांपैकी **64.3 टक्के** कर हा तळाच्या **50 टक्के** लोकसंख्येकडून येतो. एकूण जीएसटी पैकी दोन तृतीयांश पेक्षा थोडा कमी तळातील 50 टक्के लोकसंख्येतून येत आहे, मधल्या **40 टक्के** लोकसंख्येमधून

एक तृतीयांश आणि वरच्या **10 टक्के** लोकसंख्येमधून फक्त तीन ते चार टक्के येत आहे. आणि या अर्थसंकल्पात तर सरकारने प्रत्यक्ष कर कमी केले आहेत आणि भांडवलदार वर्ग तसेच त्याचे शेपूट धरून चालणाऱ्या खात्यापित्या मध्यमवर्गाला फायदा करून दिला आहे. यापूर्वी आयकराचे सहा स्लॅब होते जे आता कमी करून पाच केले आहेत. **आता रु. 3 लाख प्रतिवर्ष** उत्पन्नावर कुठलाही कर लागणार नाही, **रु. 3 लाख ते 6 लाख** उत्पन्न असणाऱ्यांना **5 टक्के** आयकर भरावा लागेल, **रु. 6 ते 9 लाख** वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना **10 टक्के, रु. 9 ते 12 लाख** वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना **15 टक्के, रु. 12 ते 15 लाख** वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना **20 टक्के** आणि रु. **15 लाखांपेक्षा जास्त** वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना **30 टक्के** आयकर भरावा लागेल. नवीन आयकर प्रणालीमध्ये प्राप्तिकर सूट मर्यादेसाठीचे उत्पन्न **रु. 5 लाख प्रतिवर्ष** वरून वाढवून **रु. 7 लाख प्रतिवर्ष** करण्यात आले आहे, ज्याचा वापर करणाऱ्या खात्यापित्या मध्यमवर्गाला वर्षाला सुमारे **34,000** रुपयाचा फायदा होईल. **परंतु मध्यमवर्गीयांना मिळणारा हा लाभ उच्चवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीयांना मिळणाऱ्या फायद्याच्या तुलनेत किरकोळ आहे.** कमाल आयकर दर 42.7 **टक्क्यांवरून** 37 ते 25 **टक्क्यांपर्यंत कमी** करण्यात आली आहे. **म्हणजेच करातून सर्वाधिक सूट सर्वाधिक श्रीमंतांना देण्यात आली आहे, म्हणजे भांडवलदार, मोठे व्यापारी, जास्त पगार घेणारे व्यावसायिक इ.**

**म्हणजे एकीकडे भांडवलदारांना सूट आणि दुसरीकडे जनतेची लूट सुरू आहे!** इंडियन एक्सप्रेसच्या एका अहवालानुसार, **2020-21** मध्ये, कॉर्पोरेटना प्रोत्साहन आणि कर सवलतीच्या रूपात सरकारचा न मिळालेला अंदाजे महसूल **1,03,285.54 कोटी रुपये** होता. सरकारी आणि गैर-सरकारी बँकांनी जनतेच्या कष्टाचा पैसा अंबानी-अदानी-टाटा-बिर्ला यांना कर्ज म्हणून दिला आहे. **अशा कर्जांपैकी, मोदी सरकारच्या 2015 ते 2021 या सहा वर्षांच्या काळात 11 लाख 19 हजार कोटींची कर्जे बुडीत खात्यात टाकण्यात आली, ज्यापैकी केवळ एक लाख कोटी रुपयांची वसुली झाली आहे. म्हणजे 10 लाख 19 हजार कोटी रुपये धनाढ्यांनी सरळ-सरळ पचवले. कर्जमाफीची ही रक्कम 2004 ते 2014 या 10 वर्षांत 22 हजार कोटी होती. 25 लाखांपेक्षा जास्त**

**कर्ज घेऊन परतफेड न करणाऱ्या 'विलफुल डिफॉल्टर्स'ची संख्या 15,000 वर पोहोचली आहे. जनतेचा पैसा लुटून सुमारे 40 श्रीमंत देश सोडून पळून गेले आणि सरकारने त्यांना जाऊ दिले!** एकीकडे भांडवलदारांना सर्व सवलती दिल्या जात आहेत पण दुसरीकडे अप्रत्यक्ष करात वाढ करून या सवलतींच्या पैशांची जनतेकडून वसूल केली जात आहे.

जनतेची दिशाभूल करण्यासाठी असा तर्क दिला जातो की सरकार अप्रत्यक्ष कर वाढवून जनतेसाठी काम करेल, जनतेला उत्तम आरोग्य सुविधा, शिक्षण, रोजगार यांसारख्या गोष्टी पुरविल्या जातील. परंतु सद्यःस्थितीवरून असे दिसून येते की एकतर जनतेकडून लुटलेला पैसा भांडवलदारांना त्यांचे भांडवल वाढवण्यासाठी दिला जातो, जे आपण वरील आकडेवारीवरून पाहिले आहे; नाहीतर, जनहिताच्या नावाखाली आपल्या देशाचे नेते या पैशांची उधळपट्टी करतात! उलट अर्थसंकल्पात सर्वसामान्यांसाठी काहीही राहत नाही. जसे की यावेळच्या अर्थसंकल्पामध्ये, '**प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना' (पीएमजीकेवाय),** जिच्या अंतर्गत, कोविड काळात मोदी सरकारने शिधापत्रिका धारकांना जी **10 किलो मोफत अन्नधान्य** देण्याची तरतूद केली होती, ती **जानेवारी 2023 पासून कमी करून 5 किलो करण्यात आली आहे.** हे ज्ञात असावे की 2013 पासून, 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा' कायद्याअंतर्गत सर्व शिधापत्रिका धारकांना रु. 3/किलो दराने तांदूळ आणि रु. 2/किलो दराने गहू दिला जात होता ज्याला मोदींनी त्यांच्या कार्यकाळात मोफत केले होते. **ही योजना बंद करण्यासाठी भांडवलदार वर्गाचाच दबाव होता कारण यामुळे व्यापक कामगार-कष्टकरी लोकसंख्येची मजबुरी कमी होत होती, त्यांची मोलभाव करण्याची शक्ती वाढत होती आणि परिणामी मजुरी वाढण्याचा दबाव निर्माण करू शकत होती.** त्यामुळे या अर्थसंकल्पात राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत असलेल्या निधीला रु. 2.14 लाख कोटी वरून कमी करून या वर्षी 1.37 लाख कोटी एवढे केले आहे. एकूण अन्न अनुदान रु. 2.87 लाख कोटींवरून कमी करून ते रु. 1.97 लाख कोटी करण्यात आले आहेत.

**आपण हे समजून घेतले पाहिजे की हे काही 'फुकट' धान्य नाही आणि ना ते मोदी सरकारचे काही उपकार आहेत. जी कष्टकरी गरीब लोकसंख्या देशातील सर्व वस्तू आणि सेवांचे उत्पादन करते, तिच्या अन्नसुरक्षेची हमी**

**घेणे आणि त्यांना पुरेसे आणि पौष्टिक अन्न उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. यासाठी भरभक्कम अप्रत्यक्ष कराच्या रूपात देशातील जनतेने आवश्यकतेपेक्षा जास्त किंमत चुकवली आहे.** म्हणूनच आमचे म्हणणे आहे की अप्रत्यक्ष करप्रणाली पूर्णपणे समाप्त केली पाहिजे. जिथपर्यंत जनतेच्या मुलभूत सुविधांचा प्रश्न आहे, तर बड्या भांडवलदारांवर आणि धनाढ्यांवर अतिरिक्त कर लादून जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या गेल्या पाहिजेत!

तुम्हाला हे माहिती आहे का की भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीवर **2 टक्के या दराने** एकदा कर लावला तर यातून पुढील तीन वर्षांसाठी देशातील कुपोषितांच्या पोषणासाठी **40,423 कोटी रुपये उभे करता येतील**. ऑक्सफॅमच्या अहवालानुसार, भारतातील वरच्या 10 श्रीमंतांची संपत्ती **27.52** लाख कोटी आहे. तुम्हाला हे माहिती आहे का की भारतातील 100 सर्वात श्रीमंत लोकांच्या एकत्रित संपत्तीतून (**54.12** लाख कोटी रुपये) संपूर्ण केंद्रीय अर्थसंकल्पासाठी **18** महिन्यांहून अधिक काळासाठी निधी दिला जाऊ शकतो.


**अशा स्थितीत आमची ही रास्त मागणी आहे की अप्रत्यक्ष कर पूर्णपणे रद्द केले जावेत आणि त्याऐवजी संपत्तीच्या आधारावर प्रगतीशील प्रत्यक्ष कर प्रणाली मजबूत केली जावी.** पुढे आपण बघूयात की कशा प्रकारे मोदी सरकारच्या या जनविरोधी धोरणांच्या परिणामी गेल्या 10 वर्षात गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी अधिक वाढत गेली.

## वाढती विषमता

मोदी सरकारच्या भांडवलधार्जिण्या धोरणांचा परिणाम म्हणजे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी सातत्याने वाढत आहे. महागाईमुळे गरीब अधिक गरीब होत आहेत आणि श्रीमंत अधिक श्रीमंत. कोरोनाच्या काळात जनतेकडून आरोग्यावर झालेला खर्च आणि बेरोजगारीची भीषण परिस्थिती यामुळे गरिबी आणखी वाढली आहे. दुसरीकडे भांडवलदारांच्या संपत्तीत या काळात प्रचंड वाढ झाली आहे. ऑक्सफॅम इंडियाच्या अहवालानुसार, 2021 मध्ये भारतातील वरच्या 1 टक्के लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या 40.5 टक्के पेक्षा जास्त संपत्ती होती, तर खालच्या 50 टक्के किंवा 70 कोटी लोकांकडे एकूण संपत्तीचा सुमारे फक्त 3 टक्के वाटा होता. याव्यतिरिक्त, महामारीच्या काळात श्रीमंत अधिक

श्रीमंत झाले आणि त्यांच्या संपत्तीमध्ये वास्तव रूपाने 121 टक्के किंवा प्रतिदिन 3,608 कोटी रुपयांची वाढ झाली. प्रत्येक भांडवली संकटाच्या वेळी हे घडते, कारण मोठे भांडवल लहान भांडवलाला आणि लहान वस्तू उत्पादकाला नष्ट करत जाते. परिणामी, संकटाच्या काळात एकूण मूल्य उत्पादनात घट होते, परंतु सर्वात श्रीमंत वर्गाला फायदा होतो, कारण तो संकटाचा फटका सहन करण्यास अक्षम छोट्या भांडवलाला आणि सर्वात जास्त, छोट्या माल उत्पादकांना गिळंकृत करतो.

अगदी अलीकडेच बिझनेस स्टँडर्डकडून हा अहवाल आला की भारतातील दरडोई उत्पन्न दुप्पट झाले आहे. बिझनेस स्टँडर्डने सांगितले की 2014-15 मध्ये दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (सध्याच्या किमतींवर) 86,647 रुपये होते. ते आता 172,000 रुपये आहे. ही वाढ 98.5 टक्के आहे. सरकारकडून त्याचा गाजावाजा ठिकठिकाणी केला जात आहे. पण याचा अर्थ संपूर्ण लोकसंख्येचे उत्पन्न वाढले असे नाही. **वास्तव हे आहे की उत्पन्नातील ही वाढ ही लोकसंख्येच्या वरच्या थरातील 10 टक्के लोकांच्या उत्पन्नातील वाढ आहे. याच्या उलट, सरासरी मजुरी कमी होत आहे. सरासरी उत्पन्नावरून हे कधीच माहिती पडू शकत नाही की देशात संसाधनांचे वितरण कसे आहे. स्पष्ट आहे की भारतातील कष्टकरी जनतेने आपल्या मेहनतीने देशाचे एकूण उत्पन्न दुप्पट केले आहे, पण ती सर्व वाढ शेठ-व्यापाऱ्यांच्या तिजोरीत गेली आहे.**




2012 ते 2021 या काळात भारतात निर्माण झालेल्या संपत्तीपैकी 40 टक्के संपत्ती केवळ 1 टक्के लोकांकडे गेली आहे आणि केवळ 3 टक्के संपत्ती तळाच्या

50 टक्के लोकांकडे गेली आहे. भारतातील एकूण अब्जाधीशांची संख्या 2020 मधील असलेल्या 102 वरून 2022 मध्ये 166 पर्यंत वाढली आहे. गौतम अदानी हा भारत आणि आशियातील दुसरा सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे आणि बहुधा पहिला सर्वात भ्रष्ट व्यक्ती असावा,ज्याचा भ्रष्टाचार मोदीजींसोबतच्या त्याच्या मैत्रीमुळे "राष्ट्रवाद" आणि "धर्मरक्षण" या "पवित्र" पडद्याने झाकला गेला आहे! कोरोनाच्या काळात म्हणजे गेल्या वर्षी 2021 मध्ये त्याची संपत्ती 49 अब्ज डॉलरने वाढली आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचा प्रमुख मुकेश अंबानी 103 अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत भारतीय बनला आहे. त्याच्या संपत्तीत वार्षिक आधारावर 24 टक्क्यांनी वाढ झाली आहे. हुरुन ग्लोबलच्या श्रीमंतांच्या यादीनुसार, गेल्या 10 वर्षांत अंबानींच्या संपत्तीत 400 टक्के आणि अदानींच्या संपत्तीत 1830 टक्के वाढ झाली आहे.

दरम्यान, भारतातील गरीब लोकसंख्या जिवंत राहण्यासाठीच्या मूलभूत गरजाही पूर्ण करण्यास असमर्थ आहे. **भुकेने ग्रस्त भारतीयांची संख्या 2018 मधील 19 कोटी वरून 2022 मध्ये 35 कोटी झाली आहे.** केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात सादर केलेल्या अहवालानुसार, **2022 मध्ये 5 वर्षांखालील मुलांमध्ये 65 टक्के मृत्यू हे भुकेमुळे झाले आहेत.** ऑक्सफॅमने म्हटले आहे की, **जगातील सर्वाधिक म्हणजे 22.89 कोटी गरीब लोक भारतात आहेत.** ऑक्टोबर 2022 च्या जागतिक भूक निर्देशांकाच्या अहवालात असे सांगण्यात आले आहे की भुकेच्या बाबतीत भारत जगातील 121 देशांमध्ये 107 व्या क्रमांकावर आहे आणि भारताची स्थिती आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिकेतील अनेक गरीब देशांपेक्षा वाईट आहे. तुमचा विश्वास असो वा नसो, या बाबतीत मोदीजींनी भारताला आधीच "विश्वगुरू" बनवले आहे! अभिमान बाळगा! नाही तर मोदीजींच्या सरकारी यंत्रणांकडून तुमच्यावर "राष्ट्रद्रोहाचा" आणि "देशद्रोहाचा" खटला भरला जाऊ शकतो!

2019 मधील कोविड महामारीनंतर, तळाच्या 50 टक्के लोकसंख्येची संपत्ती कमी झाली आहे. 2020 पर्यंत, त्यांच्या उत्पन्नाचा वाटा कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ 13 टक्क्यांपर्यंत घसरल्याचा अंदाज होता आणि त्यांच्याकडील संपत्ती एकूण संपत्तीच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी होती. त्याचा परिणाम म्हणून आहारामध्ये विलक्षण घट आणि कर्जात वाढ झाली आहे आणि मृत्यू ओढवले

आहेत. पण जर परिस्थिती अशी असेल तर शेवटी करायचे काय? असा प्रश्न पडतो. आपण हे जाणतो की हे सरकार आपल्याला मूलभूत सुविधाही पुरवत नाही, उलट सर्वसामान्यांची लूट करून अय्याशीचे मनोरे उभे केले जात आहेत. आपण हेही जाणतो की महागाईचे खरे कारण ही भांडवलशाही व्यवस्था आहे आणि त्यासोबतच मोदी सरकारच्या धोरणांमुळे महागाईने कष्टकरी जनतेचे हाल केले आहेत. **परंतु प्रश्न अजूनही आहे की शेवटी केले काय पाहिजे?**

## अंधकार गडद आहे, पण संघर्षही अटळ आहे!

साथींनो, या काळोख्या धर्मवादी हिटलरशाहीच्या युगात आपल्यासाठी संघर्ष हाच एकमेव मार्ग उरला आहे! हे काही छोटे-मोठे अस्त्र नाही, तर ते महाअस्त्र आहे ज्याने इतिहासात वेळोवेळी मोठ्या हुकूमशहांच्या शक्तींचा पाडाव केला आहे, त्यांची सिंहासने आणि मुकुट उखडून टाकले आहेत.

एका नफेखोर व्यवस्थेत सर्वसामान्य जनतेला गरिबी, महागाई, हताशा याशिवाय दुसरे काहीही मिळू शकत नाही. नफा-केंद्रित भांडवली व्यवस्थेत महागाई ही एक सामान्य घटना आहे हे आपण जाणतो. तसे तर सर्व पक्षांची सरकारे भांडवलदार वर्गाची व्यवस्थापकीय समिती म्हणून काम करत राहिली आहेत. पण मोदी सरकारने भांडवलदार वर्गाच्या सेवेचे पूर्वीचे सर्व रेकॉर्ड उद्ध्वस्त केले आहेत आणि उघडपणे मोठ्या भांडवलाच्या सेवेत ते मग्न आहे. **कामगार-कष्टकरी वर्गाचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे श्रीमंत आणि धनाढ्यांचे ते सरकार असते जे धार्मिक कट्टरता पसरवून जनतेमध्ये फूट पाडते, एका अल्पसंख्याक लोकसमुदायाला खोटे शत्रू बनवते, कनिष्ठ मध्यमवर्गीयांच्या सामाजिक-आर्थिक असुरक्षिततेचा गैरफायदा घेऊन आणि त्यांच्यात या खोट्या शत्रूची खोटी भीती निर्माण करून धार्मिक उन्माद निर्माण करते, दंगली घडवते, जनतेत फूट पाडते आणि राज्य करते आणि "राष्ट्रवाद" व "धर्माच्या रक्षणा"च्या नावाखाली भांडवलदारांची सेवा करते. आजच्या मोदी सरकारची हीच ओळख आहे. जेवढे लवकर आपण हे समजून घेऊ तेवढे चांगले, नाहीतर उद्या फार उशीर होईल.**

आज ह्यांच्या भांडवलधार्जिण्या धोरणांमुळेच श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी इतकी मोठी झालेली आहे. सरकार भांडवलदारांना करसवलती देते आणि

त्यामुळे निर्माण होणारी संपूर्ण महसुली तूट अप्रत्यक्ष करांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या खिशातून वसूल केली जाते. मुठभर भांडवलदारांच्या फायद्यासाठी संपूर्ण जनता बेरोजगारी, गरिबी आणि महागाईच्या दरीत ढकलली जात आहे.

आज या मुद्द्यावर जनतेने प्रश्न उपस्थित करू शकत नये म्हणूनच मोदी सरकार आणि संघ परिवार धर्म-जात-प्रदेश-भाषा इत्यादी आधारावर लोकांमध्ये फूट पाडत आहेत. **लव्ह जिहाद, गोहत्या, मंदिर-मशीद, पाकिस्तान-चीन इत्यादी खोट्या मुद्द्यांमध्ये जनतेला अडकवले जाते. तुम्ही विचाराल हे खोटे मुद्दे कसे आहेत? चला, बघूया.** भाजप जर गायीला आपली 'माता' मानत असेल तर गोवा, केरळ आणि ईशान्येकडील गोमांस पुरवठा कमी न होऊ देण्याची आश्वासने का देते? गाय फक्त उत्तर भारतात भाजपची माता आहे का? गोरक्षणाचा ढोल वाजवणारा भाजपचा दंगलखोर नेता संगीत सोम '*अल दुआ*' नामक कत्तलखान्याचा संचालक नव्हता का? **नागालँडमध्ये कधीही गोमांस बंदी होणार नाही असे नागालँडचे भाजप नेते विसासोली ल्होंगू यांनी का म्हटले? भाजप नेते आणि मणिपूरचे मुख्यमंत्री बीरेन सिंह असे का म्हणाले की मणिपूरमध्ये गोमांस खाण्यावर बंदी नाही, काय खावे ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे?** गोष्ट तर खरी आहे, अन्न, पेहराव, जीवनशैली ही जनतेची वैयक्तिक बाब आहे आणि त्यात कोणत्याही पक्षाला किंवा सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. मग भाजप हा दुटप्पीपणा का करतो? **मेघालयातील भाजप नेते अर्नेस्ट मोरी यांनी "मी गोमांस खातो, ही मेघालयातील जीवनशैली आहे आणि कोणीही तिला रोखू शकत नाही" असे का म्हटले? केरळमधील मलप्पुरमचे उमेदवार भाजप नेते श्रीप्रकाश यांनी गोमांसाचा पुरवठा कमी करणार नाही आणि गोमांसाच्या वापरावर कधीही बंदी घालणार नाही असे आश्वासन का दिले? स्वतः अमित शहा यांनी 2017 मध्ये असे का म्हटले होते की भाजपचा गोव्यात गोमांस बंदी घालण्याचा दूर-दूरपर्यंत कुठलाही हेतू नाही?** भाजपचे गुरू विनायक सावरकर म्हणाले होते की गाय ही फक्त एक प्राणी आहे, माता नाही! यावर भाजपचे काय म्हणणे आहे? काहीच नाही! का? **कारण सोपे आहे: गोरक्षण हे केवळ निमित्त आहे, लोकांची एकजूट तोडणे हेच खरे लक्ष्य आहे.**

**त्याचप्रमाणे 'लव्ह जिहाद' हाही एक खोटा मुद्दा आहे. जर 'लव्ह जिहाद' भाजपला धोका वाटत असेल तर भाजप नेता शाहनवाज हुसैन यांचा हिंदू एका महिलेशी विवाह, भाजप नेते मुख्तार अब्बास नकवी यांचा हिंदू महिलेशी विवाह, भाजप नेते सुशील मोदी यांचा ख्रिश्चन महिलेशी विवाह, भाजप नेते सिकंदर बख्त यांचा एका हिंदू महिलेशी, भाजप नेते सुब्रमण्यम स्वामींच्या मुलीचा एका मुस्लिमाशी विवाह 'लव्ह जिहाद' का नाही? 'लव्ह जिहाद' हा काय फक्त बाकीच्या जनतेसाठी आहे जेणेकरून या फालतू गोष्टीवर त्यांनी आपले डोके फोडून घ्यावे?** वास्तवात हा मुद्दाही खोटा असून जनतेला मूर्ख बनवून त्यांच्यात फूट पाडण्यासाठी निर्माण केला गेला आहे. कोणत्याही दोन प्रौढांना स्वतःच्या इच्छेने लग्न करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे आणि त्यात हस्तक्षेप करण्याचा कोणालाही अधिकार नसला पाहिजे.

**चीनबाबत मोदी सरकार अंधराष्ट्रवादाचे भूत उभे करत राहते, जेणेकरून लोकांना खोट्या भीतीच्या जाळ्यात अडकवून असे भासवले जाऊ शकेल की चीनने हल्ला केला तर त्याला फक्त मोदीजीच तोंड देऊ शकतील! यापेक्षा मोठं खोटं दुसरे असू शकत नाही आणि ही भीती स्वतःच एक खोटी भीती आहे.** जर मोदीजींना चीनविरुद्ध कारवाई करायचीच असेल, तर त्यांनी संघ परिवारातील गुंड-वाहिन्यांमध्ये जमलेल्या हताश चेल्या-चपाट्यांना समजावून सांगावे की चिनी झालर, खेळणी यांच्यावर बहिष्कार टाकून काहीही होणार नाही, कारण या गोष्टी भारतीय बाजारपेठेत मोदी सरकारच्या इच्छेशिवाय येऊ शकत नाहीत! **मोदीजींना चीनच्या "धोक्याला" सामोरे जायचेच असेल, तर सर्वप्रथम मोदी सरकारने चीनसोबतच्या आयात-निर्यातीवर बंदी घालावी, पण जेव्हा चीनला असे "लाल डोळे" दाखवायची वेळ येते तेव्हा मोदीजींच्या डोळ्यात मोतीबिंदू किंवा रातांधळेपणा येतो.** परिस्थिती अशी आहे की आता भारताच्या एकूण आयातीमध्ये एकट्या चीनमधून होणाऱ्या **आयातीचा वाटा 16 टक्क्यांवर पोहोचला आहे, जो तीन दशकांपूर्वी केवळ 5 टक्के होता** आणि त्याचे मूल्य जवळपास **90 अब्ज अमेरिकन डॉलर्स** आहे! **देशात कुठलीही आयात सरकारच्या परवानगीशिवाय होत नाही.** मग मोदी सरकार चिनी आयात का वाढवत आहे? याउलट भारताची चीनला निर्यात फक्त 23 अब्ज डॉलर होती, म्हणजे **67 बिलियन डॉलर (55,38,75,60,00,00**

**किंवा 5538 अब्ज रुपये) ची व्यापार तूट! हे मोदीजी काय करत आहेत?** हे आपण समजलेच असेल की चीनबाबत अंधराष्ट्रवादाची लाट पसरवणेसुद्धा संघ परिवार आणि मोदी सरकारसाठी केवळ जनतेला उन्मादात ढकलून सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठीचे हत्यार आहे. चिनी साम्राज्यवादाशी असलेल्या सीमावादाचा प्रश्न पाहिला तर तिथे मोदी सरकार हे फुसका फटाक सिद्ध झाले आहे. मोदीजी चीनसमोर गर्जना करण्यासाठी तोंड उघडतात, पण त्यांच्या तोंडातून मात्र 'म्याव' निघते! **खरे तर चीनचे लोक आणि भारतातील लोक यांच्यात कोणताही झगडा नाही.** इथल्या धर्मवादी फॅसिस्टांमुळे ज्याप्रकारे जनता त्रस्त आहे, तशीच तिथल्या सामाजिक फॅसिस्ट शक्तींमुळे जनता त्रस्त आहे. जनतेची दिशाभूल करून त्यांना आपल्या मागे आणण्यासाठी आणि जनतेने आपले खरे मुद्दे आणि हित विसरून खोट्या मुद्द्यांकडे वळावे यासाठी सीमांच्या दोन्ही बाजूला "राष्ट्रवादाची" शेगडी गरम केली जाते. "राष्ट्रवाद हे चोरांचे शेवटचे आश्रयस्थान आहे" असं कुणीतरी बरोबरच म्हटलं होतं. **देशप्रेमी असणे म्हणजे कोणत्याही नेत्याप्रती, धर्माप्रती, पक्षाप्रती निष्ठा नसून देशाशी निष्ठा असणे. परंतु देश म्हणजे कागदावर बनवलेला नकाशा नसून त्यात राहणारी कष्टकरी माणसेच देश असतात जे स्वतःच्या मेहनतीने प्रत्येक वस्तू आणि सेवेचे उत्पादन करतात. जर एखाद्या पक्षाचे सरकार, एखादी व्यवस्था आणि तिची धोरणे या कष्टकरी लोकांचे हक्क हिरावून घेत असतील, त्यांना रोजगार देत नसतील, त्यांना महागाईच्या ओझ्याखाली दाबून टाकत असतील, शिक्षण आणि आरोग्यव्यवस्थेला बाजाराची वस्तू बनवून टाकत असतील तर ते देशद्रोही आहेत. नरेंद्र मोदी, भाजप किंवा संघ म्हणजे देश नव्हे, आपण देश आहोत, आपण सगळेच जे दिवसभर कारखान्यात, शेतात, खाणीत, कार्यालयात कष्ट करतो, मरतो. म्हणूनच त्यांच्या विरोधात आवाज उठवणे हा देशद्रोह नसून देशप्रेमाचे लक्षण आहे.**

त्यामुळे ज्या मुद्द्यांवर संघ परिवार आणि मोदी सरकार धार्मिक कट्टरता, धर्मांधता आणि अंधराष्ट्रवाद पसरवते त्या सर्व मुद्द्यांकडे बारकाईने पाहिल्यावर तुमच्या लक्षात येईल की हे सर्व एक मोठे कुभांड, एक मोठा घोटाळा आणि निव्वळ असत्याच्या ढिगाऱ्यापलीकडे दुसरे काही नाही.

**आज आपण संघ परिवार व भाजप सरकार आणि त्यांच्या गुंड टोळ्यांचे**

**वास्तव समजून घेण्याची गरज आहे. त्यांच्या डावपेचांचा बुरखा फाडणे गरजेचे आहे. आज या खोट्या मुद्द्यांच्या आडून आमचे मूलभूत हक्कही आमच्याकडून हिसकावले जात आहेत आणि भांडवलदारांच्या नफ्यासाठी आणि पुढारी-मंत्री-अधिकारी यांच्या ऐशआरामासाठी सर्वसामान्य जनतेचे घाम-रक्त वाया घालवले जात आहेत. अशा स्थितीत हातावर हात धरून शांत बसून काहीही साध्य होणार नाही.**

त्यासाठी जनतेला तिच्या खऱ्या मुद्द्यांवर एकजूट करून धर्मवादी शक्तींचा खरा चेहरा जनतेसमोर आणण्याची आज गरज आहे. हे लक्षात घेऊनच **भगतसिंह जनअधिकार यात्रा** सुरू करण्यात आली आहे. खातरीशीररित्या आपल्या जीवनाच्या दैनंदिन समस्यांवर तोडगा तेव्हाच होऊ निघू शकतो जेव्हा क्रांतिकारी मार्गाने **अशी व्यवस्था निर्माण केली जाईल जिचे स्वप्न शहीद भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, अशफाकुल्ला, सुखदेव, राजगुरू, यतींद्रनाथ दास, बी. के. दत्त यांच्यासारख्या बुद्धिमान, वैज्ञानिक क्रांतिकारकांनी पाहिले होते.** म्हणजेच एक अशी व्यवस्था जिच्यामध्ये समूहांमध्ये संघटित उत्पादक वर्ग, म्हणजे कामगार, कष्टकरी आणि गरीब शेतकरी मिळून सर्व शेते, कारखाने, खाणींचे सामूहिक मालक असतील, त्यांच्या या समूहांची किंवा कष्टकरी पंचायतींची संरचना राष्ट्रीय कष्टकरी पंचायतीपर्यंत जाईल, निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्या हातात असेल, निवडून आलेल्या प्रतिनिधींना ताबडतोब परत बोलावण्याचा अधिकार त्यांना असेल, हे लोकांचे समूहच देशाच्या स्तरावर मिळून काय उत्पादन करायचे, कसे उत्पादन करायचे आणि कसे वितरण करायचे हे ठरवतील; एक अशी व्यवस्था ज्यामध्ये उत्पादक आणि उत्पादन सहायक काम करणाऱ्यांनाच भाकरी खाण्याचा अधिकार असेल; परजीवीप्रमाणे इतरांच्या कष्टावर उधळपट्टी करण्याचा अधिकार कोणालाही नसेल. म्हणजे फक्त स्वराज्य नाही तर लोकस्वराज्य, म्हणजेच कामगार-कष्टकरी जनतेचे स्वतःचे राज्य. हे आपले दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, परंतु यासाठी जनतेला जागृत, एकजूट आणि संघटित करण्याची पहिली पायरी काय आहे? आपल्या दैनंदिन समस्या आणि गरजांवर सध्याच्या सरकारला घेरणे, त्याला आपले हक्क देण्यास



किंवा सत्तात्याग करण्यास भाग पाडणे हे आपले तात्कालिक कार्य आहे. **ते मुद्दे आहेत: रोजगार हमीचा कायदेशीर अधिकार, समान आणि मोफत शिक्षणाचा अधिकार, दर्जेदार आणि मोफत वैद्यकीय उपचारांचा अधिकार, सरकारी घरांचा अधिकार आणि महागाईपासून मुक्ती.**

**आपल्या जीवनातील या खऱ्या प्रश्नांवर जागृत, एकजूट आणि संघटित होऊन संघर्ष करण्याच्या उद्दिष्टाने भगतसिंह जनअधिकार यात्रा सुरू करण्यात आली आहे.** आपल्या क्रांतिकारी शहिदांनी ज्याप्रकारे सर्व प्रकारच्या जातीयवाद, धार्मिक कट्टरवाद, अंधराष्ट्रवादी उन्मादाविरुद्ध लढा दिला, तोच संघर्ष आज नव्याने संघटित करण्याची गरज आहे. ही यात्रा म्हणजे या संघर्षाची घोषणा आहे. या यात्रेत खालील मागण्यांवर जनतेला एकजूट करून संघटित करण्याचा संकल्प घेण्यात आला आहे.

## महागाईशी जोडलेल्या आपल्या मागण्या

1) **सर्व वस्तू आणि सेवांवरील सर्व अप्रत्यक्ष कर ताबडतोब रद्द केले जावेत आणि प्रगतीशील करप्रणालीद्वारे कॉर्पोरेट कर, आयकर, मालमत्ता आणि वारसा कर या स्वरूपात श्रीमंत वर्गावर थेट कर लादून सरकारी महसूल गोळा करावा.** यामुळे किमती थेट निम्म्यावर येतील.

2) **महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी साठेबाजी, वायदा व्यापार (फ्युचर ट्रेड) आणि सट्टेबाजीवर बंदी घालण्यासाठी कठोर कायदा बनवावा, ज्याअंतर्गत हे दंडनीय गुन्हे म्हणून घोषित करण्यात यावेत.**

3) **मूलभूत वस्तू आणि सेवांच्या वितरण प्रणालीच्या व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण केले जावे** आणि सरकारने ते पूर्णपणे आपल्या हातात घ्यावे.

4) **अन्नधान्याच्या किमती वाढवणारी आणि श्रीमंत शेतकरी आणि भांडवली-जमीनदारांना अतिरिक्त नफा देणारी हमीभावाची व्यवस्था रद्द करावी. सरकारी खरेदीसाठी कमाल सरासरी लाभदर देणारी किंमत ठरवली जावी आणि या खरेदीच्या व्यवस्थेपर्यंत गरीब आणि अल्पभूधारक शेतकरी पोहोचू शकतील याची खातरी केली जावी.**

5) **सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सार्वत्रिकीकरण करून सर्व नागरिकांना**

**अन्न उपलब्ध करून द्यावे.**

जर ही पावले उचलली गेली तर महागाई आटोक्यात येऊन सर्वसामान्य कष्टकरी जनतेला मोठा दिलासा मिळू शकतो. आपणा सर्वांना आम्ही आवाहन करतो की आमच्या सोबत या, ह्या यात्रेशी जोडून घ्या. आज या मागण्यांवर व्यापक लोकसंख्येला संघटित करून लढा उभारण्याची गरज आहे. त्यासाठीच ही यात्रा सुरू करण्यात आली आहे. लक्षात ठेवा: जो लढतो, तोच जिंकतो! **आम्ही सर्व न्यायप्रेमी कामगार-कष्टकरी साथी, विद्यार्थी-युवक आणि प्रगतीशील व जनतेची बाजू घेणाऱ्या नागरिकांना आवाहन करतो की आपण या यात्रेत सहभागी व्हा आणि तिला आणखी व्यापक बनवण्यात योगदान द्या.**

## अंधाराचे युग हटणार, जो लढणार तो जिंकणार!
## वाऱ्याशिवाय ना पान हलते, लढल्याशिवाय ना काही मिळते!!

| यात्रेचा व्हॉलंटियर फॉर्म भरण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा.करा. | यात्रेबद्दल अधिक माहितीकरिता हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. | यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपसोबत जोडून घेण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. |
| --- | --- | --- |

## आयोजक

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

## नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन

## संपर्क

**महाराष्ट्र:** परमेश्वर 7798364729, बबन 9619039793
**दिल्ली:** योगेश 9289498250, प्रियंवदा 9693469694
**उत्तर प्रदेश:** अमित 8858288593, अविनाश 9891951393
**हरियाणा:** इंद्रजित 8010156365, अजय 8685030984
**बिहार:** अजित 6297974751, वारुणी 7070571498
**उत्तराखंड:** कविता 9971158783, अपूर्व 7042740669
**पंजाब:** ईंजिंदर 9888080820, सुखजिंदर 9815705653
**आंध्र प्रदेश:** श्रीनिवास 7995828171, अरुणा 8500208259
**तेलंगणा:** आनंद 9971196111; **चंडिगढ:** शुभम 8196803093

WhatsApp Number : 9923875414 /bsjayatra